**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

**महापालिका सचिव कार्यालय**
**दि. ०४/०५/२०२६**

**मा. महासभा दि. ०६/०५/२०२६**
**पुरक घोषणा**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीम. ---------------------------------------------**
**नगरसेवक/नगरसेविका**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची "ड" प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक ०६/०५/२०२६ रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र. क्र. | विषय |
|---|---|
| २३ | सन्मा. सदस्य अनिल दिवाकर सावंत यांचा दिनांक ३०/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>-----------------------------------------------------------------------------------<br>शहरातील मंडप व्यावसायिकांना UDPCR तरतुदी प्रमाणे मंडप व्यावसायिकांना तात्पुरत्या शेडसाठी परवानगी देणेबाबत धोरण ठरविणे. |
| २४ | सन्मा. सदस्य राकेश रतिशचंद्र शाह यांचा दिनांक ३०/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>-----------------------------------------------------------------------------------<br>मंडप व्यावसायिकांना तात्पुरत्या स्वरुपात शेड उभारण्याकरीता धोरण निश्चित करणेबाबत. |
| २५ | सन्मा. सदस्य भगवती शर्मा यांचा दिनांक ३०/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>-----------------------------------------------------------------------------------<br>जाहिरात फलक (होर्डींग्ज) बाबतची निवीदा रद्द करुन नविन निविदा मागविणेबाबत. |

**(दिनेश कैलास कानगुडे)**
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# अनिल दि.सावंत

नगरसेवक - स्थायी समिती सदस्य, मिरा-भाईंदर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य

**कार्यालय** : १, अस्मिता एस्कोन १, नया नगर, मिरा रोड (पू), ठाणे - ४०११०७
**पत्रव्यवहार पत्ता** : बी-५२, पूनर्वसू, सुष्टी कॉम्पलेक्स, सेक्टर - ३, मिरा रोड (पू), ठाणे - ४०११०७
**मो.** 9987525295 / 9323226295 | **ई-मेल.** sawant07meera@gmail.com

प्रकरण क्र. २३ करिता

दिनांकः ३०/०४/२०२६

**प्रति**
**मा.सचिव.सो.**
**मिरा भाईंदर महानगर पालिका**

मिरा भाईंदर महानगरपालिका,
सचिव विभाग 'ज'
स.प./न.प./ज.प./का.प./मा.अ.
आवक क्र ....९..... दि.३०/०४/२०२६

**विषय :मा.महासभा दि.6.4.2026 मध्ये 'ज 'चा प्रस्ताव घेणेबाबत.**

महोदय,

वरील विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रांतिक महानगर पालिका अधिनियमामध्ये असलेल्या तरतुदीनुसार खालिल प्रस्ताव मा.महासभा दि.6.4.2026 मध्ये चर्चेसाठी घेण्यात यावा.

मिराभाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ३०० पेक्षा अधिक स्थानिक मंडप व्यवसायिक आहेत. नागरीकांना जन्मापासून अगदी मनुष्याच्या मृत्यू समयी अथवा त्यानंतर सुद्धा प्रत्येक सामाजिक कार्यक्रम / सणा सुधीचा कार्यक्रम / लग्नसमारंभासाठी / वाढदिवस / वर्षगाठ / वैगेरे इतर कार्यक्रमासाठी शहरातील मंडप व्यवसायीकांची गरज कायमच लागत असते.

शहरात आलेले मंडप व्यवसायिक त्यांचे सामान शहराची विविध ठिकाणच्या खाजगी मालकीच्या जागांमध्ये मंडप साहित्याचा साठा करून ठेवत असतात.

UDCPR मध्ये सेक्शन २.१.६ नुसार बिल्डींग स्टोअरेज या संज्ञे मध्ये तात्पुरती शेडला परवानगी देण्याची तरतूद आहे. बऱ्याचश्या व्यवसायीकांनी वारंवार मनापा जवळ विनंती अर्ज करून सुद्धा मनापा तर्फे परवानगी देण्याचे टाळले जात आहे, त्यामुळे मागणी करून सुद्धा या मंडप व्यवसायीकांना परवानगी मिळत नाही. गेल्या काही दिवसांपासून मनपा कारवाईच्या नावाखाली विविध ठिकाणी असलेल्या तात्पुरते शेडच्या बांधकामावर जेसीबी, पोकलेन याचा वापर करून तोडक कारवाई करीत आहे. त्यामुळे मंडप व्यावसायिक व व्यवसायावर अवलंबून असलेले इतर कर्मचारी वर्ग यांच्यावर मोठे संकट ओढवले आहे.

त्याकरिता शहरातील या मंडप व्यावसायिकांना UDPCR / तरतुदी प्रमाणे उद्भवलेले परीस्तीथीचा सहानुभूती पूर्वक विचार करून मंडप व्यावसायिक यांना तात्पुरत्या शेड साठी परवानगी देण्यासाठी योग्य धोरण ठरवावे.

**सूचक** **अनुमोदक**

**अनिल दिवाकर सावंत** **जय राजेंद्र ठाकूर**

# राकेश रतिशचंद्र शाह

## मा. सभापती -स्थायी समिती

मिरा भाईंदर महानगरपालिका


प्रकरण क्र.२४ करिता                                    दि. 30/04/2026

मिरा भाईंदर महानगरपालिका
सचिव विभाग 'ज'
स.प./न.प./ज.प./का.प./आ.अ.
आवक क्र ...२... दि.30/04/2026

प्रति,

**मा. नगरसचिव**

मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय : मा.महासभा दि.06/04/2026 रोजीच्या बैठकीमध्ये 'ज' चा प्रस्ताव चर्चेस घेणेबाबत.**

महोदय,

वरील विषयानुषंगाने नम्र निवेदन असे की, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात स्थानिक मंडप व्यावसायिक कार्यरत असून, शहरातील नागरिकांच्या विविध सामाजिक, सांस्कृतिक व कौटुंबिक कार्यक्रमांसाठी त्यांच्या सेवेची सातत्याने आवश्यकता भासते. विवाहसोहळे, वाढदिवस, धार्मिक कार्यक्रम, सण-उत्सव, राजकीय कार्यक्रम तसेच अंत्यविधी व तत्सम सामाजिक प्रसंगांमध्ये मंडप व्यावसायिकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

सदर मंडप व्यावसायिक आपल्या व्यवसायासाठी आवश्यक असलेले मंडप साहित्य विविध खाजगी मालकीच्या जागांवर साठवून ठेवत असतात. UDCPR मधील कलम 2.1.6 नुसार *Building Storage* या संज्ञेंतर्गत तात्पुरत्या शेडसाठी परवानगी देण्याची तरतूद उपलब्ध आहे. तथापि, अनेक मंडप व्यावसायिकांनी महानगरपालिकेकडे वेळोवेळी विनंती अर्ज सादर करूनही अशा तात्पुरत्या शेडसाठी आवश्यक परवानगी मिळत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

तरी, शहरातील मंडप व्यावसायिकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न, नागरिकांना मिळणारी आवश्यक सेवा आणि UDCPR मधील तरतुदी विचारात घेऊन, संबंधित नियमांच्या अधीन राहून मंडप व्यावसायिकांना तात्पुरत्या शेडसाठी नियमानुसार परवानगी देण्याबाबत योग्य व स्पष्ट धोरण निश्चित करणेकरिता सदर प्रस्ताव मा. महासभेमध्ये चर्चेस घेऊन योग्य निर्णय करण्यात यावा, ही विनंती.

**आपला विश्वासू,**

(signature)

**(राकेश रतिशचंद्र शाह)**
**नगरसेवक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**


कार्यालय : मुख्य कार्यालय मिरा भाईंदर महानगरपालिका, दुसरा माळा, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे – ४०१ १०१.

जन संपर्क कार्यालय : शॉप नं. ९, शिवनेरी बिल्डींग, बी. पी. क्रॉस रोड, रोड नं. ४, साऊथ, खारीगांव, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे – ४०१ १०५

मोबाईल : 9930331778 / 9870099447 Email : shivshaktideco@gmail.com

प्रकरण क्र. २५ करिता

दिनांक :- ३०/०४/२०२६.

**प्रति,**
**मा. सचिव सो.**
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
सचिव विभाग
स.प./न.प./ज.प./क्षा.ब./अ.अ.
आवक क्र. - ०३ 30/04/२०२६

**विषय** :- दि.०६/०५/२०२६ रोजीच्या मा. महासभेत "ज" चा प्रस्तावाबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविणेकरीता जाहिरात फलक (होर्डींग्ज) उभारणेकरीता मागील अनेक वर्षांपासून प्रशासनामार्फत निविदा प्रसिद्ध केली जाते. प्रशासकीय कार्यकाळात प्रशासनातर्फे बी.ओ.टी. तत्वावर, जाहिरात फलक (होर्डींग्ज) उभारणेबाबत निविदा प्रसिद्ध केली असता अनेक नामांकीत जाहिरात कंपन्यांनी आपल्या निविदा सादर केल्या होत्या. त्यापैकी एका कंपनीने सुमारे जास्त दराची निविदा सादर केली होती. प्रशासनाने प्रशासकीय काळात एका विशिष्ट जाहिरात कंपनीला निविदा मिळावी, याकरीता त्या कंपनीच्या सुविधानुसार निविदेच्या अटीशर्ती नव्याने करून उपरोक्त निविदा रद्द करून नविन निविदा प्रसिद्ध केली.

निविदाधारकांनी सुरूवातील आलेल्या दरापेक्षा कमी दराची निविदा भरली व प्रशासनाने ती मंजूर केली. यामुळे महानगरपालिकेचे करोडो रूपयांचे आर्थिक नुकसान झालेले आहे.

महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले असल्याने प्रशासनाने सदर निविदा रद्द करून महापालिका क्षेत्रात अजूनही विविध मोक्याच्या ठिकाणी, रस्ते/चौक, महापालिकेच्या प्रमुख वास्तू / मिळकतीवर जाहिरात फलक (होर्डींग्ज), डिजीटल होर्डींग्ज उभारणेबाबत नविन निविदा प्रसिद्ध करावी. याकीरीता दि.०६/०५/२०२६ रोजीच्या मा. महासभेत महानगरपालिका अधिनियमाप्रमाणे "ज" चा प्रस्ताव सादर करीत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा**      **अनुमोदक :- ॲड श्रीम. श्रद्धा कदम**